# 21 व्या शतकाला विकासोन्मुख करणारे भारतीय संविधान आणि मराठी साहित्य

**प्रा.डॉ. अविनाश कृ. मेश्राम**
*कला महाविद्यालय, बुलडाणा*

***सारांश :–***
*भारतीय परिस्थितीचा विचार केला तर असे आढळून येते की, बौध्द काळापूर्वी प्राचीन भारतातील कायद्याचे अंतिम उद्दिष्ट काय होते? ब्राम्हणी विचारसरणीच्या मनुने समाजाला चार वर्णात विभागले. ज्यामुळे एक मानवजातीचे कृत्रीम वर्गीकरण झाले. मनुचा उद्देश्य सामाजिक सौहार्द टिकविणे असा होता असे म्हणतात. प्रत्येकाची पात्रता तो कोणत्या वर्णात जन्माला येतो यावर ठरायची. प्लेटो यांनी सामाजिक न्यायाची संकल्पना एका विशिष्ट वर्गाच्या दृष्टीकोनातून मांडली. संपूर्ण राजसत्ता आणि सरकार बुध्दीजीवी वर्गाकडे सोपविण्यात यावी. कारण बुध्दीजीवी वर्गातील लोक सक्षम, योग्य, विवेक ील आणि न्यायप्रिय समजले जातात. निर्णय घेण्याचा अधिकार या वर्गासाठी सिमित ठेवला, हा प्लेटोचा सर्वसत्तावाद होता. जो निश्चितच लोकतंत्र विरोधी आणि समताविरोधी होता. सर्व लोकांना समान अधिकार न देता वर्णव्यवस्थेसारखेच इतर वर्गाला एका वर्गाच्या सेवेसाठी अर्पित केले होते. सॉक्रेटीसनेसुध्दा न्यायाला भाक्ति ाली वर्गाच्या हिताची रक्षा करण्याला सांगितले. नीत्से यांनी सुध्दा न्यायाला अतिमानव (सुपरमॅन) ची कृपा आणि इच्छेचा विषय मांडला. अतिमानव किंवा सर्व ाक्ती व्यक्ती जे बोलतो तेच भुभ, उचित आणि न्याय आहे. चातुर्वण्य व्यवस्था, प्लेटोची संकल्पना, सॉक्रटीस किंवा नीत्से यांचे विचार यांच्यात सामाजिक न्याय्य आदर्शाची संकल्पना स्पश्ट व्हावी असे कुठलेही तत्त्व दिसत नाही. त्यांच्या मते सामाजिक न्यायाचा मुख्य केंद्र बिंदू एका विषेश वर्गाचे हित होते.*
*डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी वर्णव्यवस्थेच्या विरोधात बंड उभारले. त्यांच्या मते चातुर्वर्ण्य हे समाजाला घातक असून ती अपयशी ठरणारी व्यवस्था आहे. वेगवेगळया वर्णात सक्तीचे वर्गीकरण करून सामाजिक सौहार्द टिकविण्याची संकल्पना सामाजिक समतेवर आधारित नसल्याने अपयशी ठरल्या आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक विषमतेला न्याय ठरविण्याच्या प्रयासाला विरोध केला. त्यांच्या मते ''वर्णव्यवस्थेत स्वातंत्र्य, समता व बंधुता या तत्त्वांना काहीच स्थान नाही. यामुळे सामाजिक विषमतेचा विकास आणि मानवाच्या अस्तित्त्वाचा लोप होतो. त्यात भाुद्र, दलित इत्यादी वर्गाच्या आर्थिक सुरक्षेची हमी नाही. जे ब्राम्हण वर्गाच्या खालच्या स्तरात येतात. वर्ण व्यवस्थेत चार स्तर आहेत. जे सामाजिक विषमतेला समाजाचे अधिकृत आदर्श मांडले जातात. म्हणून डॉ. आंबेडकरांनी वर्णाश्रम धर्माच्या संपूर्ण सामाजिक न्यायाच्या संरचनात्मक व कार्यात्मक व्यवस्थेला नाकारले आणि म्हणाले की, सामाजिक न्यायाचे जे मूलतत्त्व आहे त्याला वर्णाश्रम धर्म प्रतिरोधक आहे.''[1] म्हणूनच भारतात वि ोषतः हिंदू समाजात सामाजिक अन्यायामुळेच डॉ. आंबेडकरांना सामाजिक न्यायाची संकल्पना रूजविण्यासाठी बाध्य केले असल्याचे दिसते.*
*सामाजिक न्याय भारतीय संविधानाचे सर्वोत्तम आदर्श आहे. ज्यांचे स्वरूप किंवा विषय या प्रकारे आहे. ''सामाजिक न्याय, लोकांच्या जिवनात सामाजिक, भौक्षणिक, आर्थिक आणि राजकीय असंतुलन समाजात करून न्यायावर आधारीत समाजाची सहाय्यता करतो. सामाजिक न्याय दुर्बल, वृध्द, बहिष्कृत, स्त्री मुले आणि पीडित लोकांना त्यांचे अधिकाराच्या स्वरूपात परिभाषित केल्या जाऊ भाकते. जिथे राज्य सामाजिक दृष्टीने उच्च, आर्थिक दृष्टीने श्रीमंत राजकीय अर्थाने सत्ताधीश आणि शैक्षणिक स्थितीने विकसित लोकांसोबत कठीण स्पर्धेत संरक्षण करते. सामाजिक न्याय जो मानव निर्मित असमानतेच्या विरूध्द आहे आणि जो विषमतेच्या नावावर प्रभावी बनविला गेला आहे.''[2] या संविधानातील बाबी एकविसाव्या भातकाला विकासाच्या दिशेने नेणाऱ्या महत्त्वपूर्ण मैलाचे दगड ठरतील हे निर्विवाद सत्य आहे.*

**प्रस्तावना :–**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाअंतर्गत सामाजिक न्याय या संकल्पनेचा पुरस्कार केलेला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'सामाजिक न्याय' या संकल्पनेचा विचार केवळ भारतीय समाजरचनेतील परिवेशापुरताच सीमीत केलेला नसून त्यांची ही संकल्पना वैश्विक स्तरातील माणसाच्या सामाजिक न्यायाचा विचार करणारी आहे. खरं तर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तत्वज्ञानच मुळात सामाजिक न्यायाच्या तत्वावर अधिष्ठीत असलेले दिसून येते. म्हणूनच ते लोक ाही म्हणजे 'समता' अशी लोकशाहीची एका शब्दात व्याख्या करीत असत. लोकशाही शासनपध्दतीमध्ये 'समता' प्रस्थापित केल्याशिवाय देशात 'सामाजिक न्याय' अस्तित्वात येऊ भाकत नाही. अशी त्यांची दृढ धारणा होती. म्हणून संविधानाच्या प्रास्ताविकेमध्ये (Preamble) त्यांनी 'सामाजिक न्यायाचा' आग्रह धरलेला दिसतो. 26 जानेवरी 1950 रोजी संविधान लागू होऊन कायद्याचे राज्य अस्तित्वात आले. तेव्हापासून प्रत्येक नागरित कायद्यासमोर समान आहे. कायद्याने समान ठरविलेल्या प्रत्येक नागरिकाला आपला सामाजिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक विकास करता यावा म्हणून कल्याणकारी राज्याची निर्मिती करण्यात आली. या कल्याणकारी राज्याच्या प्रशासनातून दुर्बल घटकांचा विकासही भाासनाने केला आहे. परंतु आता जागतिकीकरणाच्या या वाढत्या रेटयामुळे कल्याणकारी राज्याची संकल्पनाच संपुष्टात येत आहे. अशा गोंधळलेल्या सामाजिक पार्श्वभूमीवर राज्यघटनेतील 'सामाजिक न्याय' या संकल्पनेची आवश्यकता वाढली असून त्यांची सांगड

कायद्यासोबत घालण्याची गरज आजच्या घडीला निर्माण झाली आहे. त्याचा प्रस्तुत शोधनिबंधात विचार केला आहे.

**सामाजिक न्यायाची संकल्पना :—**

तथागत गौतम बुध्द हाच 'सामाजिक न्याय' या संकल्पनेचा प्रथम उद्‌गाता व पुरस्कर्ता आहे. बुध्दाच्या धम्मात बुध्दाने समता प्रस्थापित करून खऱ्या अर्थाने 'सामाजिक न्यायाचे तत्व' अंगिकारले होते. नव्हे बुध्दाच्या धम्माचा पायाच 'सामाजिक न्यायावर' अधिष्ठीत होता हे प्रथम आपण लक्षात घेतले पाहिजे. त्यानंतर आधुनिक काळात 'सामाजिक न्यायाची' ही संकल्पना डॉ. आनंद तेलतुम्बडे लिहितात त्याप्रमाणे ''लुइजी तपोरेली द् अझेग्लिओ नावाच्या सिसिलियन धर्मगुरूने ती प्रथम व्यवहारात आणली.''[3] मात्र एक संकल्पना म्हणून ती मानवी संस्कृतीच्या जन्माइतकीच प्राचीन आहे असेही ते नोंदवितात. याचा अर्थ बुध्दकाळापासून ती प्रचलित आहे असे सिध्द होते. न्यायाबाबत अर्नेस्ट बार्कर म्हणतो की, ''न्याय हा मूल्यांचा मेळ घालणारा व समन्वय साधणारा असतो. तो त्या मूल्यांची समायोजित (ॲडजस्टेड) व एकात्म पूर्णाकष्तीच असतो.'' माणसाचे व मूल्याचे समायोजन हे न्यायाचे बार्करने सांगितलेले प्रयोजन आपण भारतातील समाजव्यवस्थेच्या संदर्भात लक्षात घेणे गरजेचे आहे. इथे मूल्यांशी मेळ घालणे म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुता यांच्याशी मेळ घालणे होय. भारतीय संविधानाने नीतीमत्ता व लोकशाही मूल्यांचा मेळ घालूनच सामाजिक न्याय प्रस्थापित केलेला आहे. खरं तर भारतीय समाजव्यवस्थेत शतकानुशतके वरचढ राहिलेल्या घटकांनी सत्ता—संपत्ती व प्रतिष्ठा यांचा मोठा वाटा बळकावला आणि बहुजन समाजातील लोकांना या तिन्ही गोष्टींपासून वंचित ठेवले. त्यामुळे लोकशाही मूल्यांची समाजात रूजुवात झाल्यानंतर ही परंपरागत विषमता असहय झाली आणि यातूनच सामाजिक न्यायाची कल्पना प्रचलित झालेली असावी. भारतीय समाजव्यव्थेमध्ये चातुर्वर्ण्य व्यवस्था होती त्यामुळे अस्पृश्यतेचे चटके स्वतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनुभवले होते. उच्च विद्याविभूशित असूनही बाबासाहेबांना हिंदू संस्कृतीने माणूसपणाचा दर्जा दिला नाही. त्यावरून सर्वसामान्य अस्पृश्य माणसाची स्थिती काय असेल याची कल्पना त्यांना आली होती. त्यामुळे समाजात सामाजिक न्याय प्रस्थापित करायचा असेल तर कायद्याची बंधने लादूनच तो अस्तित्वात येऊ भाकतो. त्यासाठी त्यांनी सामाजिक न्यायाला संविधानाच्या चौकटीत बसवून अधिक मान्यता दिली. आणि सामाजिक न्यायाचा पुरस्कार आयुष्यभर केला.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर व सामाजिक न्याय :—**

आज 'सामाजिक न्याय' या भाब्दाचा वापर बोलण्यातून आणि लिखाणातून मोठया प्रमाणात वाढलेला आहे. त्यामुळे 'सामाजिक न्याय' या संकल्पनेचे खूप आकर्षण वाढलेले आहे. घटनाकारांनी संविधानाच्या प्रास्ताविकेतच (Preamble) 'सामाजिक न्याय' या भाब्दाचा जाणिवपूर्वक उल्लेख केलेला आहे. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना संविधानाच्या माध्यमातून 'सामाजिक न्याया' वर अधिष्ठीत असेली समाजरचना अस्तित्वात आणायची होती. त्यासाठी त्यांनी संविधानाच्या अनुच्छेद 38, 39, 46 यामधून सामाजिक न्यायाचा आद र्ा मांडलेला दिसतो. संविधानाचे प्रास्ताविक (Preamble) म्हणते की, आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकास, सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्यायाची, प्रत्येकाला दर्जाची व संधीची समानता प्राप्त करून देण्याची हमी देतो. उल्लेखनीय बाब म्हणजे या प्रास्ताविकेत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपले लक्ष सामाजिक न्यायाकडे वेधलेले आहे. या प्रास्ताविकेमध्ये सामाजिक न्याय हा आर्थिक न्यायाच्या आधी येतो आणि आर्थिक न्याय राजकीय न्यायाच्या आधी येतो. भाब्दांच्या हया क्रमावरून हे लक्षात येते की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आर्थिक व राजनैतिक न्यायाआधी 'सामाजिक न्यायाला' अग्रक्रम दिला आहे. जोपर्यंत समाजात काही श्रीमंत, काही गरीब, काही उच्च, काही नीच, काही अत्याचारी, काही अत्याचारपीडीत आहेत, भाोषित आणि भाोषक आहेत अशा समाजात न्याय आहे असे आपण म्हणून भाकत नाही. दलित, आदिवासी स्त्रीपुरूषांना दर्जा, सुविधा व संधीची समानता आपण जोपर्यंत प्राप्त करून देत नाही. तोपर्यंत तरी समाजात 'सामाजिक न्याय' प्रस्थापित होऊ शकत नाही. या सर्व लोकांना तो न्याय मिळवून देणे हेच संविधानाचे ध्येय आहे. हे ध्येय साध्य करण्यासाठीच कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान असल्या पाहिजेत. त्यासाठी कायद्याची अंमलबजावणी काटेकोर करणे आवश्यक आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा लढा हा सामाजिक न्यायाचा लढा होता. या सामाजिक न्यायासाठी त्यांनी संपूर्ण जीवन खर्ची घातलेले दिसते. म्हणूनच त्यांनी संविधानाच्या प्रास्ताविकेमध्ये आर्थिक व राजनैतिक न्यायापेक्षा सामाजिक न्यायाला अधिक प्राधान्य दिलेले आहे. त्याचे महत्वाचे कारण म्हणजे सामाजिक न्याय प्रस्थापित झाल्याशिवाय आर्थिक व राजकीय न्यायाला अर्थ प्राप्त होऊ भाकत नाही. म्हणून त्यांनी संविधानाच्या भाग 3 मध्ये 'मुलभूत अधिकार व भाग 4 मध्ये 'राज्य धोरणाची नितीनिदेशक तत्वे' यामध्ये सामाजिक न्यायाचा अंर्तभाव केला आहे. सामाजिक न्यायाचे ध्येय गाठण्यासाठी संविधानाने कलम क्र. 17 नुसार अस्पृश्यता नष्ट करण्याचा प्रयत्न केला. कलम क्र. 21 नुसार व्यक्तीस्वातंत्र्य बहाल केले. कलम क्र. 45 नुसार सर्वांना मोफत शिक्षण मिळण्याची सोय उपलब्ध करून दिली. समाजात कुठल्याही प्रकारची सामाजिक विषमता राहू नये यासाठी कायदा अस्तित्वात आला. या कायद्याद्वारे सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी अनुसूचित जाती, जमाती अन्याय प्रतिबंधक कायदा, हुंडा प्रतिबंधक कायदा, बालमजूर प्रतिबंधक कायदा, दृष्ट रूढी परंपरा, अंधश्रध्दा यावर प्रतिबंध घालण्यात यावा व त्याची रीतसर अंमलबजावणी करावी. कारण जे लोक पिढयान्‌पिढया न्याय हक्कापासून वंचित राहिले, त्यांना देशाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मागासवर्गीयांचा नोकरीत आजही अनुषेश भरल्या जात नाही. अनुषेश भरण्याची जबाबदारी ज्या अधिकाऱ्यांवर आहे, त्यांनी

सामाजिक न्यायाची जाणीव ठेवून आरक्षणाच्या मुद्याकडे पाहिले, तर अनुषेश भरून काढण्यास मदत होईल. परंतु असे होतांना दिसत नाही. उलट डॉ. यशवंत मनोहर म्हणतात त्याप्रमाणे "प्रस्थापित भाक्तींनी आता सामाजिक न्यायाच्या तत्वाचाच गळा दाबायला प्रारंभ केला आहे. देशाच्या सार्वजनिक जीवनातून हे तत्व हद्पार करण्याचे प्रयत्न होत आहेत. भारतीय समाजात आज सामाजिक न्याय धोक्यात आलेला आहे. डॉ. मनोहर यांचे भाष्य एकूणच वर्तमान वास्तव परिस्थितीवर आधारीत आहे."[5] हे डॉ. मनोहर यांचे भाष्य एकूणच वर्तमान वास्तव बदलण्यासाठीच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानामध्ये सामाजिक न्यायाचा अंर्तभाव केला आहे.

**कायद्याचे राज्य व सामाजिक न्याय :–**

भारतीय संविधानामध्ये असे स्पष्ट नमूद केले आहे की, कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान आहेत. कुणी श्रेष्ठ वा कुणी कनिष्ठ नाही. व्यक्ती कोणत्या जातीचा, धर्माचा, पंथाचा व वं ाचा आहे याला महत्व न देता कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान आहेत. कायदा अ ाप्रकारचा कुठलाही भेदभाव व्यक्तीसोबत करणार नाही. एखाद्या व्यक्तीने काही गुन्हा केला असेल तर तो गुन्हा सिध्द होईपर्यंत भाासन त्या व्यक्तीला कुठल्याही प्रकारची शिक्षा देऊ भाकत नाही. अशी व्यक्तीची काळजी भाासन घेईल. कायद्यानुसार स्त्री असो वा पुरूष यांना उपजीविकेचे पर्याप्त साधन मिळविण्याचा सारखाच अधिकार असेल, सर्वसामान्य माणसाचे हित जपल्या जाईल व त्याला सर्वाधिक उपकारक होईल अ ारीतीने भौतिक साधनसंपत्तीचे वाटप राज्य करील. जनसामान्यांना अपायकारक होईल अशाप्रकारे धनदौलतीचा व उत्पादनसाधनांचा एकाच ठिकाणी संचय घडून येईल अशी आर्थिक यंत्रणा राबविली जाणार नाही याची खबरदारी राज्य घेईल, राज्य दुर्बल घटकांची विशेषतः अनुसूचित जाती–जमातीच्या लोकांच्या शैक्षणिक, आर्थिक बाबींचे हितसंवर्धन करील आणि सामाजिक अन्याय तसेच सर्व प्रकारच्या भोषणापासून त्यांचे रक्षण करील. सर्व नागरिक समान आहेत. या तत्वानुसार मानवता जोपासून मानवाची प्रतिष्ठा वाढविण्याचा राज्य प्रयत्न करील. लेखनस्वातंत्र्य, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, व्यक्तीचे मुलभूत अधिकार याची राज्य जपणूक करील. सामाजिक न्यायाला अवरोध करणाऱ्या सर्वच गोष्टींना राज्य नकार देईल. व अवरोध दूर करण्याचा प्रयत्न करील. राज्य या सामाजिक न्यायाशी प्रतिबध्द आहे. ते त्याचे ध्येय आहे. असे मानून लोकांच्या अधिकाराची व कल्याणाची राज्य हमी देण्याची कृती करील तेव्हाच सामाजिक न्याय प्रस्थापित केल्या जाऊ शकतो.

**मराठी साहित्याचा विकास :–**

आजही 21 व्या भातकात भारतीय समाज हा जातील चिकटलेला आहे, धर्माला चिकटलेला आहे. तो जातीला सोडायला तयार नाही, धर्माला सोडायला तयार नाही. तर मग मराठी साहित्य व्यापक व जोरकस कसे होईल? हा प्रश्न भेडसावतो आहे. म्हणून एक दिशा भोधण्याची कधी नव्हे इतकी गरज निर्माण झाली आहे. मुळात मराठी माणसाची सांस्कृतिक समज बदलण्याची गरज आहे. त्यांचा दृष्टीकोन बदलला पाहिजे. जोपर्यंत हे घडून येत नाही. तोपर्यंत मराठीचा विकास होणे भाक्य नाही. आजही आपण 18 व्या, 19 व्या भातकातील पट घेतो, एखादी घटना घेतो व त्यावर कलाकृती लिहितो. म्हणजेच आपण अजूनही पुरातन भातकातच लोळतो आहे असे दिसते. आज आपल्याला पुढील 100 वर्षात मराठी साहित्य कसे असेल? पुढील वर्षात पाणी टंचाईचा प्रश्न कसा असेल? वैज्ञानिक दृष्टी कशी असेल याचा विचार मराठी साहित्यिकाने केला तरच मराठी साहित्य सकस होईल व विकासाच्या दि ोने प्रगतीपथ राहील. ते साहित्य धर्मातीत असावे, जातीतीत असावे, वैज्ञानिक चिकित्सा करणारे असावे, समाजातील विभिन्न प्रश्नांना भिडणारे असावे. तरच ते 21 व्या भातकातील साहित्य असू भाकते.

**निष्कर्ष :–**

1. कायद्यासमोर सर्व व्यक्ती समान आहेत.
2. व्यक्ती कोणत्याही जाती, धर्म व पंथाची असो त्याला सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक विकास साध्य करण्याचा पूर्ण अधिकार आहे.
3. कायदा व सामाजिक न्याय याचा अतूट असा संबंध आहे. कायद्याची काटेकोर अंमलबजावणी केली तरच सामाजिक न्याय वास्तव स्वरूपात अस्तित्वात येऊ भाकतो.
4. कायद्याच्या माध्यमातूनच दुर्बल घटकांना सामाजिक न्यायाची हमी देता येते व त्यांना मुख्य प्रवाहात आणता येते.
5. सामाजिक न्याय प्रस्थापित करणे हे संविधानाचे अंतिम ध्येय आहे. परंतु संविधानाची अंमलबजावणी कशी केली जाते त्यावर ते अवलंबून आहे.
6. तथागत गौतम बुध्द हाच सामाजिक न्याय या संकल्पनेचा प्रथम उद्गाता व पुरस्कर्ता आहे.
7. आधुनिक काळात सामाजिक न्यायाची संकल्पना लुइजी तपोरेली द् अझेग्लिओ नावाच्या सिसिलियन धर्मगुरूने ती प्रथम व्यवहारात आणली.
8. डॉ. बाबासाहेब यांनी संविधानाच्या अनुच्छेद 38, 39, 46 अंतर्गत सामाजिक न्याय संकल्पनेचा पुरस्कार केला.
9. जागतिकीकरणाच्या वाढत्या रेटयामुळे कल्याणकारी राज्याची संकल्पना संपुष्टात येत आहे. त्यामुळे सामाजिक न्याय धोक्यात आले आहे.
10. सामाजिक न्याय प्रस्थापित झाल्याशिवाय आर्थिक व राजकीय न्यायाला अर्थ प्राप्त होऊ भाकत नाही. म्हणून कायद्याद्वारे सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यावर भाासनसंस्थेने जोर द्यावा.
11. माणुसकीचे साहित्य असावे. सात्यि मानवतेची जोपासना करणारे असावे.

**संदर्भग्रंथ :–**

1. *डॉ. भि. रा. आंबेडकर, राईटिंग्स ॲण्ड स्पिचेस, खंड 3,1987 पृ. 25*
2. *डी. एन. सदाशिव, लॉ ॲण्ड जस्टिस (संपादित) 1978 पृ. 29*

3. सामाजिक न्याय आणि जागतिकीकरण – डॉ. आनंद तेलतुम्बडे, लोकवाङमय गृह, मुंबई प्र. आ. 2007 पृ. 4
4. राजकीय सिध्दांत आणि विश्लेशण – डॉ. भा. ल. भोळे, पिंपळापुरे बुक डिस्ट्रीब्युटर्स, नागपूर प्र. आ. 2008 पृ. 126
5. युगसाक्षी साहित्य – डॉ. यशवंत मनोहर, श्रेयस प्रकाशन, चंद्रपूर प्र. आ. 2001, पृ. 381
6. भारताचे संविधान – भारत सरकार विधि व न्याय मंत्रालय, भासकीय फोटोझिंको मुद्रणालय, पुणे चौथी आवृत्ती, 1996